## सह दिवाणी न्यायालय, तथा न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग परंडा यांचे न्यायालयात

**नि.फौ.ख.क्र. ९१/२०१४.** **निशाणी क्र.७२**

### सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ ची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | पोपट तुकाराम खटकाळे, |
| वय | – | ४८ वर्षे, |
| व्यवसाय | – | नोकरी, ग्रामसेवक, मुगांव आणि साकत. |
| राहणार | – | साकत खु. ता. परंडा जि. धाराशिव. |

**सरतपासणी सहा. सरकारी वकील श्री.व्ही.एस.गायकवाड साहेब यांचे मार्फत –**

दिनांक २५.०१.२०११ रोजी ग्रामपंचायत कुंभेफळ येथे ग्रामपंचायत अधिकारी म्हणुन कार्यरत होतो. त्यादिवशी नरसु तुळशीराम नाईकवाडे यांनी सुबराव मारुती नाईकवाडे यांचे मृत्युचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दिला होता. अर्ज आल्यानंतर ग्रामपंचायमध्ये मृत्यु रजिस्टरला नोंद पाहिली. मी आज ते मृत्यु नोंदणी रजिस्टर सोबत आणलेले आहे. नोंदणी रजिस्टर पहाणी वरुन नोंदणी क्र. १ वरुन सुबराव मारुती नाईकवाडे यांचा मृत्यु दिनांक १९.०५.२००६ रोजी झाल्याचे व त्यांचे मृत्युचे नोंद घेण्यात आल्याचे दिसुन येत आहे. अभिलेखाची पडताळणी करुन अर्जानुसार आमचे कार्यालयाने मृत्युचे प्रमाणपत्र अर्जदार नरसु तुळशीराम नाईकवाडे यांना दिले. मृत्यु प्रमाणपत्रामधील माहिती आमचे ग्रामपंचायत कार्यालयातील अभिलेखातील नोंदीप्रमाणे बरोबर आहे. प्रमाणपत्रास **निशाणी क्र. ७३** देण्यात येते. पोलीसांनी माझा जबाब घेतला होता. आता मला जबाब दाखविण्यात आला, तो माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिण्यात आला, जबाबातील मजकुर बरोबर आहे.

**<u>उलटतपास आरोपी क्र. ३ ते ७ तर्फे विधीज्ञ श्री. एस.बी.देवकते यांचे मार्फत –</u>**

पोलीसांनी माझा जबाब किती तारखेला नोंदविला हे मी सांगु शकत नाही. मी मृत्युच्या नोंदणीचा क्रमांक हा आहे असे पोलीसांना सांगितल्याचे आठवत नाही. सुबराव मारुती नाईकवाडी यांच्या मृत्युची नोंद ज्या दिवशी ते मरण पावले त्या दिवशी घेतली. ते मृत्युपत्र निशाणी क्र. ७३ कोणी दिले त्या संबंधी कर्मचा–याचे नाव मला माहित नाही. सन २०११ मध्ये हस्त लिखीत मृत्युचे प्रमाणपत्र निघत होते. हे म्हणणे खरे नाही की, मृत्यु प्रमाणपत्र निशाणी क्र. ७३ हे आमच्या अभिलेखाप्रमाणे बरोबर आहे हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे आहे की, मी मृत्यु प्रमाणपत्र दिलेले नाही. परंतु त्यातील माहिती रेकॉर्ड प्रमाणे बरोबर आहे. मी सन २००८ ते २०११ मध्ये कुंभेफळ येथे नोकरी केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष दिली.

**<u>उलटतपास आरोपी क्र. १ व २ तर्फे विधीज्ञ श्री. एन.व्ही.सुर्यवंशी यांचे मार्फत –</u>**

मृत्युपत्रावर नाईकोंडे सुबराव मारुती अशी नोंद आहे. खरेदीखतावर लिहुन देणार म्हणुन सुबराव मारुती नाईकवाडे अशी नोंद आहे. खरेदीखत साक्षीदारास दाखविण्यात आले त्यास **निशाणी क्र. ७४** देण्यात येते. खरेदीखतात नमुद लिहुन देणार क्र. २ या व्यक्तीचेच मृत्युचे प्रमाणपत्र देण्यात आले हे मी सांगु शकत नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2025.06.20 17:53:35 +0530

( दिलीप गं. जगताप )

दिनांक–२०.०६.२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, परंडा.